प्रा. कुछवे सर ( 46)

Peer reviewed Journal Impact Factor:7.265 ISSN-2230-9578

# Journal of Research and Development




*Multidisciplinary International Level Referred Journal*

April-2022 Volume-13 Issue-21



**Chief Editor**

Dr. R. V. Bhole

'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102



**Editor**

**Dr. M.N. Kolpuke**
Principal,
Maharashtra Mahavidyalaya, Nilanga, Dist. Latur

**Dr. V.D. Satpute**
Principal,
Late Ramesh Warpudkar College, Sonpeth, Dist. Parbhani



**Address**

'Ravichandram' Survey No-101/1, Plot,No-23,Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

# Journal of Research and Development

*A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal*

*20 April 2022 Volume-13 Issue-21*



Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth, Dist. Parbhani

**Chief Editor**
Dr. R. V. Bhole
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

| Guest Editor | Guest Editor |
|---|---|
| **Dr. M.N. Kolpuke**<br>**Principal,**<br>**Maharashtra Mahavidyalaya, Nilanga, Dist. Latur** | **Dr. V.D. Satpute**<br>**Principal,**<br>**Late Ramesh Warpudkar College, Sonpeth, Dist. Parbhani** |

**Executive Editors**
Dr. C.J. Kadam
**I/c Vice-Principal and IQAC Coordinator,**
**Maharashtra Mahavidyalaya, Nilanga, Dist. Latur**
**Dr. M.B. Patil**
**IQAC Coordinator**
**Late Ramesh Warpudkar College, Sonpeth, Dist. Parbhani**

**Editorial Board**

| | | |
|---|---|---|
| **Dr. N.V. Pinamkar** | **Dr. A.M. Mulajkar** | **Dr. M.D. Kachave** |
| **Dr. A.B. Dhalgade** | Dr. A.D. Chavan | Dr. B.R. Shinde |


Published by-Dr. R. V. Bhole, 'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.

© All rights reserved with the Editors

Ramesh Warpudkar (ACS) College
Dist. Parbhani




| | | |
|---|---|---|
| 38 | दळण वळण नवीन सुधारणा एक विचार प्रवाह<br>**श्रीकांत गव्हाणे** | 141-143 |
| 39 | महिला उद्यमिता<br>**डॉ सुरेखा पिपलानी** | 144-146 |
| 40 | आंबेडकरोत्तर काळातील आंबेडकरवादी चळवळी<br>**प्रा.डॉ. बी.एम. काळे** | 147-151 |
| 41 | मोगलकालीन कृषी व्यवसायाचा ऐतिहासिक दृष्टीकोण<br>**पवार डी. व्ही.** | 152-154 |
| 42 | भारतातील कौशल्य विकास व योजनांचा चिकित्सक अभ्यास<br>**प्रा.पांचाळ विजय किशनराव** | 155-157 |
| 43 | स्त्री आणि पुरूषांमधील सामाजिक योगदान आणि भावनिक कार्यकुशलता या घटकांचा तुलनात्मक अभ्यास.<br>**शितल भागवत जाधव प्रा.डॉ.रमेश पठारे** | 158-162 |
| 44 | उद्योजक आणि महिला उद्योजकांची वाटचाल<br>**डॉ. कु. धुतमल वर्षा सिताराम** | 163-165 |
| 45 | आधुनिक हिन्दी साहित्य में नारी<br>**प्रा. डॉ. वडवकर एस.ए.** | 166-168 |
| 46 | बँकींग क्षेत्रातील सुधारणा<br>**प्रो.डॉ.एम.डी.कच्छवे** | 169-173 |
| 47 | नागरी सहकारी बँकांचा पूर्व इतिहास आणि सद्यस्थिती<br>**प्रा. डॉ.अरूण बळीराम धालगडे सय्यद फारुखअली जहूरअली** | 174-176 |

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, 20 April 2022, Volume-13, Issue-21

Late Ramesh Warpudkar (ACS) College Sonpeth Dist. Parbhani

# बँकींग क्षेत्रातील सुधारणा

**प्रो.डॉ.एम.डी.कच्छवे**
संशोधन मार्गदर्शक व वाणिज्य विभाग प्रमुख
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ, जि.परभणी
Email-mkachave@gmail.com

प्रस्तावना

सद्याच्या काळात बँकींग क्षेत्र हे मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. अलिकडच्या काळात भारतीय बँकींग कार्यप्रणालीत मोठ्या प्रमाणात बदल घडून आले आहेत. भारतीय अर्थव्यवस्थेत बँकाचे महत्व वाढल्यामुळे बँकावर नवनवीन जबाबदा-या सोपवून सातत्याने बदल घडून येताना दिसत आहेत. बँकींग कार्यात संगणकाच्या आणि इंटरनेटच्या वापरामुळे व विस्तारामुळे अमूलाग्र बदल दिसून येत आहेत. त्यामुळे आजच्या जागतिकीकरणाच्या युगात बँकींग व्यवसायातील तंत्रज्ञानाला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. मोठ्या प्रमाणावर संगणकांच्या वापरामुळे माहिती व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात एक प्रकारची क्रांतीच झालेली आहे. आज भारतातील बँका विविध बँक विषयक सेवा आपल्या ग्राहकांना उपलब्ध करून देताना विशिष्ट सेवांवर जास्त भर देताना दिसून येतात. मानवी शरीरात रक्तवाहिन्यांना जेवढे महत्व असते तेवढे महत्व देशांच्या अर्थव्यवहारात बँकांना असते.

भारतात 1991 मध्ये नवीन आर्थिक धोरण स्वीकारण्यात आले. परकीय बँका, थेट परकीय गुंतवणूक इत्यादींना परवानगी देण्यात आली. भारतीय बँकानी इतर देशातही आपल्या शाखा उघडल्या. त्यामुळे अमेरीका, युरोप, जपान, फ्रॉन्स, आशिया देश, इत्यादी सोबतच्या आर्थिक व्यवहारात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. भारतीय बँकांना हे सर्व व्यवहार कार्यक्षमपणे हाताळण्यासाठी त्यांच्या कार्यपद्धतीत बदल करून संगणीकृत आणि आधुनिक कराव्या लागल्या सध्याच्या स्पर्धेच्या युगात बँकांना टिकाव धरण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरण्याची गरज निर्माण झाली आहे. आज भारतातील बँका विविध बँकविषयक सेवा आपल्या ग्राहकांना उपलब्ध करून देतांना विशिष्ट सेवांवर जास्त भर देताना दिसून येतात.

शासनाने बँकींग क्षेत्राचा योग्य दिशेने विकास व्हावा यासाठी वेळोवेळी विविध प्रकारचे बँकींग कायदे करून आणि विविध बँक सुधारणा समित्या स्थापन करून सकारात्मक प्रयत्न केले. प्रादेशिक ग्रामीण बँकांच्या सुधारणा बाबतची 1977 ची दांतवाला समिती, 1987 ची केळकर समिती, 1994-95 मधील भंडारी समिती स्थापन केली. भारत सरकारने 1991 मध्ये एम. नरसिंहन यांच्या अध्यक्षतेखाली वित्तीय क्षेत्र सुधारणा विषयक समिती स्थापन केली. 14 ऑगस्ट, 1991 रोजी रिझर्व्ह बँकेचे माजी गर्व्हनर एम.नरसिंहन यांच्या अध्यक्षतेखाली नऊ सदस्यीय 'वित्तीय क्षेत्र सुधारणाविषयक समिती' ची स्थापना केली. या समितीने 19 नोव्हेंबर, 1991 रोजी आपला अहवाल सादर केला. या समितीच्या शासनाने बहुतेक शिफारशी स्वीकारून टप्याटप्याने अंमलात आणल्या. यामुळेच बँकींग क्षेत्रात फार मोठे बदल घडून आले आहेत. माहिती तंत्रज्ञानाचे क्षेत्र झपाटयाने विस्तारीत होत असल्यामुळे सध्या सर्वच क्षेत्रात संगणकाचा वापर वाढत असल्याचे दिसून येते. इंटरनेटच्या प्रसारामुळे ग्राहकांना आता बँकेत जाण्याची गरज नाही घरात बसून किंवा प्रवासात असताना देखील धनादेश भरणे, पासबुक नोंदी अद्यावत करने ही कामे करता येतील. दूर अंतरावर असून सूध्दा चर्चा, विचार, विनिमय, सूचना, आदेश, संदेश व माहितीवहन इत्यादी गोष्टी एकमेकाकडे पाठविता येतील. इंटरनेटमुळे व संगणकामुळे बँकींग सेवा आता वर्षातील चोवीस तास उपलब्ध होऊ शकेल.

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani



**संशोधनाचे आदेश :-**

**सदर शोधनिबंध खालील उदेश डोळयासमोर ठेवून करण्यात आला आहे.**

1. बँकेची संकल्पना स्पस्ट करणे,
2. बँकेच्या नरसिंहन समितीचा शिफारशीचा अभ्यास करणे
3. बँकींग क्षेत्रातील सुधारणांचा अभ्यास करणे
4. निष्कर्ष काढणे

**संशोधनाची गृहीतके :-**

1. नरसिंहन समितीने सुचविलेल्या बहुतांश समस्या शिफारषी शासनाने स्वीकारल्या
2. 1991 व 1997 साली बँकींग क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी समिती नेमण्यात आली.

**अभ्यास पध्दती :-**

सदर शोध प्रबंधांसाठी दुय्यम माहितीचा आधार घेतला असून दुय्यम माहितीत संदर्भ ग्रंथ, दैनिक वर्तमानपत्रातील संपादकीय लेख, मासीके यांचा आधार घेतलेला आहे. वरील उदिष्टे डोळया समोर ठेवून सामग्री संग्रहन केले आहे

**बँक क्षेत्रातील सुधारणांची आवश्यकता :-**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारत सरकारने मिश्र अर्थव्यवस्था व लोकशाही पद्धतीचा अवलंब करून देशाच्या विकासासाठी आर्थिक नियोजनाचा अवलंब केला. 1969 व 1980 साली अनुक्रमे 14 व 06 व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. राष्ट्रीयीकरणामुळे शेती, लघुउद्योग, दारिद्य्र रेषेखालील घटक, आर्थिकदृष्ट्या दूर्बल घटक इत्यांदींना प्राधान्याने कर्ज पूरवठा करण्यात आला. बँकांची संख्यात्मक वाढ झाली परंतु त्यांचा गुणात्मक विकासाकडे दुर्लक्ष करण्यात आले. अनेक आजारी बँका दिसून आल्या. अर्थव्यवस्थेला दिवाळखोरीच्या संकटातून वाचविण्यासाठी शासनाने सोने तारण ठेवले. 1991 साली डॉ. मनमोहन सिंह यांनी आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम हाती घेतला बँकांची कार्यक्षमता वाढवून त्या नफ्यात याव्यात म्हणून प्रयत्न करण्यात आले. बँकींग व्यवसायात सुधारणा करणे आवश्यक असाल्याचा निर्वाळा नरसिंहन समितीने दिलेला आहे. खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे भारताला सुध्दा वित्तीय क्षेत्रात सुधारणा करणे क्रमप्राप्त झाले.

**बँकींग व्यवसायातील आर्थिक सुधारणांची उदिष्टये :-**

1. भारतीय बँक व्यवसाय व वित्तीय प्रणाली, बँकांची धोरणे, बँक व्यावस्थापन संघटात्मक रचना व बँकांच्या कार्यपद्धती मध्ये सुधारणा घडवून आणणे.
2. भारतीय बँक पध्दती व भारतातील वित्तीय संस्था, सहकारी बँका, ग्रामीण बँका इत्यादीवर परिणामकारक नियंत्रण ठेवून सर्व वित्तीय संस्थांची संतुलीत वाढ करणे.
3. बँका आणि वित्तीय संस्थांचे व्यवहार, जबाबदा-या आणि किफायतशीरपणा यांच्या संदर्भात त्या सर्व संस्थांची कार्यक्रमता व परिणामकारकता वाढविणे.
4. देशातील सर्व क्षेत्रातील बँका व वित्तीय संस्था यांच्या सर्व व्यवहारावर देखरेख ठेवणे.
5. भारतीय बँकींग प्रणालीची वैधानिक चौकट लक्षात घेवून आवश्यक त्या दुरुस्त्या करणे.
6. बँकांची सुरक्षितता विश्वासार्हता वाढविणे.
7. नवीन कर्जाची गरज लक्षात घेवून बँकाकडून योग्य प्रतिसाद मिळेल असे वातावरण निर्माण करणे.
8. बँकांच्या कार्यात आधुनिकीकरण, यांत्रिकीकरण, संगणकीकरण इत्याचीचा वापर करणे.

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth • Dist. Parbhani



**एम. नरसिंहन समिती :-**

व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतर बँकांवर रिझर्व्ह बँकेचे नियंत्रण असल्यामुळे बँकांनी ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर शाखा उघडून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. बँकांच्या दर्जावर विपरित परिणाम झाला. त्यामुळे बँकांची उत्पादकता कार्यक्षमता खालावली आणि नफाही कमी झाला याचा विचार नरसिंहन समितीने विचार करुन आपली मते खालील प्रमाणे दिली आहेत.

1. रोख राखीव प्रमाण (Cash Reserve Ratio) (CRR) रिझर्व बँकेकडील रोख राखीव प्रमाण 15% वरून 5% पर्यंत कमी करावे.
2. वैधानिक रोखता प्रमाण (statutory Liquidity, Ratio) (SUR) 38.5 टक्क्याहून पुढील पाच वर्षात 25% पर्यंत कमी करावे
3. शेती लहान उद्योग, प्राधान्य क्षेत्र इत्यादीना कर्ज देण्यात सुधारणा करावी. या क्षेत्राला एकून कर्जाच्या 10% कर्ज बँकांनी द्यावे.
4. देशातील व्याजदरांची संरचना बाजाराधिष्ठीत असावी बँकांना स्वतःचे व्याजदर ठरविण्याची संमती देण्यात यावी
5. देशात चतुःस्तरीय बँक संरचना निर्माण करण्यात यावी अशी संरचना निर्माण करण्यासाठी बँकांच्या विलीनीकरण व संपादनाच्या प्रक्रियेला प्रोत्साहन द्यावे.
6. बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची प्रक्रिया थांबविण्यात यावी. खाजगी क्षेत्रात नवीन बँका स्थापन करण्याची समती द्यावी.
7. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना अधिक स्वायतता देण्यात यावी रिझर्व्ह बँकेचे या बँकावर नियंत्रण व नियमन असावे, त्यांना अधिकारी नियुक्त करण्याचे स्वातंत्र द्यावे.
8. कर्ज वसुलीच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी विशेष कर्जवसुली न्यायाधीकरणे स्थापण करणे.
9. भांडवल बाजाराचे उदारीकरण घडवून आणणे.
10. शाखा परवाना पद्धती रद्द करण्यात यावी
11. संशयित व बुडीत कर्जासाठी मालमत्ता पुनर्रचना निधी स्थापन करावा.

**एम. नरसिंहन समिती - II**

भारत सरकारने 1997 साली वित्त मंत्रालयाने एम नरसिंहन यांच्या अध्यक्षतेखाली दुसरी समिती नेमली. या समितीचे नाव 'किंग क्षेत्र सुधारणा समिती' असे होते. या समितीला आता पर्यंत झालेल्या बँकिंग क्षेत्र सुधारणांचे परीक्षण करून भारताच्या वित्तीय व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक बनविण्यासाठी वित्तीय क्षेत्र सुधारणेचा एक निश्चित कार्यक्रम तयार करण्याचे सांगण्यात आले. या समितीने एप्रिल 1998 मध्ये आपला अहवाल सादर केला.

**समितीने खालील महत्वाच्या शिफारशी केल्या :-**

1. 1991 ते 1997 या कालावधीत पहिल्या नरसिंहन समितीने केलेल्या शिफारशी लक्षात घेवून बँकींग क्षेत्रात सुधारणा व प्रगतीचा आढावा घेणे.
2. आंतरराष्ट्रीय वित्तीय बाजारातील बदल लक्षात घेवून देशातील बँकींग व्यवस्थेत कोणते बदल करणे आवश्यक आहेत.
3. बँकींग क्षेत्रातील कायदेशीर व तांत्रिक बदल लक्षात घेऊन बँकांचे धोरण ठरविणे.
4. नाणे बाजार व विदेशी चलन बाजार यांचे संबंध अधिक दृढ करण्याचे दृष्टीने सूचना कराण्यात आल्या.

Warpudkar (ACS) College, Sonpeth Late Ra... Dist. Parbhani

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, 20 April 2022, Volume-13, Issue-21

5. आर्थिक व्यवहारावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने समितीने वित्तीय व नियमन देखरेख मंडळाच्या स्थापनेची शिफारस केली.
6. लघु उद्योगांच्या गरजांसाठी अनेक लहान बँकांच्या स्थापनेवर भर द्यावा.
7. बँकींग कायद्यांचे पुनर्विलोकन करून त्यांना अद्यावत करण्यात यावे.
8. आजारी बँकांना अर्थक्रम बनविणे शक्य नाही झाल्यास त्यांना सक्षम बँकेत विलीन करण्याऐवजी बंद करावे.

1991 नंतर बँकींग कंत्रातील सुधारणा.

भारत सरकारने 1991 मध्ये आर्थिक सुधारणांचे धोरण स्वीकारामुळे जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर भारतीय वित्तीय प्रणालीचा विकास करणे आणि त्यात खालील प्रमाणे सुधारणा करणे अपरिहार्य ठरले. भारत सरकारने नरसिंहन समित्यांच्या अनेक शिफारशी स्वीकारल्यामुळे भारतीय बँकींग व्यवसायात खालीलप्रमाणे सुधारला घडून आल्या.

**1. भांडवल पुर्याप्तता प्रमाण (Capital Adequary Ratio - CAR):**

बँकांनी दिलेल्या कर्तावरील व्याज जोपर्यंत प्रत्यक्षात प्राप्त झाल्याशिवाय त्याची उत्पन्नात गणना न करता अशा संदिग्ध व बुडीत कर्जाना अलाभदायी मालमत्ता समजावे. अशा अलाभदायी मालमत्तेला भांडवल पर्याप्तता गुणोत्तराचे निकष लावण्यात यावेत. यामुळे सर्व बँकांनी भांडवल पर्याप्ततेचे किमान 9% चे बंधन साध्य करणे गरजेचे आहे.

**2 रोख राखीव निधीचे प्रमाण (cash Reserve Ratio-CRR) :**

बँकांना रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार आपल्याकडे जमा झालेल्या ठेवीपैकी विशिष्ट प्रमाणात रक्कम रिझर्व्ह बँकेकडे ठेवावी लागते. यालाच रोख राखीव निधीचे प्रमाण असे म्हणतात. नरसिंहन समितीच्या शिफारशीवरून (CRR) कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**3 वैधानिक रोखता प्रमान (Statutory Liquidity Radho - SLR):-**

व्यापारी बँकांना आपल्याकडील एकून ठेवीपैकी ठराविक प्रतिशत रक्कम स्वत:कडे रोख स्वरूपात किंवा सोन्याच्या स्वरूपात ठेवाव्या लागतात. या प्रमाणालाच SLR असे म्हणतात. या रक्कमेचा उपयोग बँका ठेवीदारांना आपल्या ठेवी मागणी करताच परत करण्यासाठी करतात. बँकांना या ठेवी कर्ज देण्यासाठी वापरता येत नाहीत.

**4. अलाभदायी मालमत्ता (Non Performing Assets NPA) :-**

बँकांनी कर्जरूपी दिलेल्या मालमत्तेवरील व्याज सहा महिन्यापेक्षा जास्त काळांसाठी थकीत झाल्यास त्यास अलाभदायी मालमत्ता असे म्हणतात. बँकांचे अलाशदायी मालमत्तेचे प्रमाण कमी करण्यासाठी रिझर्व्ह बँक 1991 पासून निर्देश देवून ते 10% च्या आत ठेवावे असे सुचविले होते.

**5. धोरणात्मक हिशोब पद्धतीतील घटक :-**

रिझर्व्ह बँकेने 1992 पासून देशातील सर्व व्यापारी बँका करीता एक समान निर्दोष हिशोब पद्धती असावी या हेतूने सर्व बँकांसाठी धोरणात्मक हिशोब पद्धती सुरू केली. बुडीत कर्जाची तरतूद, उत्पन्नाचे मोजमाप या सारख्या बाबींचे रिझर्व्ह बँकेच्या निकर्षानुसार एक समान पद्धतीने आर्थिक बाबीचे मापन कावे

**6. बँक दरात घट :-**

रिझर्व्ह बँक व्यापारी बँकांना दिलेल्या कर्जावर ज्या दराने व्याज आकारते त्याला बँक रेट असे म्हणतात. नरसिंहन समितीच्या शिफारशीप्रमाणे बँक रेट कमी केला आहे. बँकदर कमी झाल्याचा परिणाम म्हणजे व्यापारी बँकांना रिझर्व्ह बँककडून स्वस्त दरात कर्जे मिळतात. त्यामुळे व्यापारी बँकांना ग्राहकांनाही स्वस्त दराने कर्जे देतात.

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani



**7. व्याज दराबाबत सुधार :-**

नरसिंहन समितीच्या शिफारशीनुसार रिझर्व्ह बँक कडून नियंत्रीत होणारी व्याजदर पद्धती बंद करावी व देशातील व्याज दराची संरचना बाजाराधिष्ठीत असावी आणि बँकांना स्वतःचे व्याजदर ठरविण्याची परवानगी देण्यात यावी असे निश्चित करण्यात आले.

**8. कर्जवसुली कायदा व कर्जवसुली न्यायाधिकरणे :-**

व्यापारी बँकांनी दिलेली कर्जे व अग्रिमे यांच्या वसुलीचा प्रश्न बँकासमोरील सर्वात महत्वाचा व बँकांना भेडसावणार आहे. त्यामुळे हा प्रश्न सोडविण्यासाठी सरकारने 1993 मध्ये वसुली कायदा समंत केला. त्यामुळे कर्ज वसुलीच्या कार्यात एक प्रकारची गती आली. तसेच 1995 मध्ये प्रमूख 8 शहरात कर्जवसुली न्यायालये स्थापन केली.

**9. बँकींग लोकपाल योजना :-**

बँकींग सेवामधील त्रुटी विरूध्द ग्राहकांच्या तक्रारीचे त्वरीत व अल्प खर्चामध्ये निवारण करण्यासाठी जून 1995 मध्ये " लोकपाल योजना' सुरत करण्यात आली. सध्या देशात असे एकून 10 लोकपाल कार्य करीत आहे.

**10. परवाना शिथिलीकरण :-**

रिझर्व्ह बँकेने नवीन व्यापारी बँका व त्यांच्या परवान त्याबाबतचे परवाना धोरण शिथील करण्यात आले आहे. परिणामी देशात खाजगी क्षेत्रात अनेक नवीन बँका स्थापना झाल्या. अनेक बँकांनी ग्रामीण आणि अर्धनागरी भागातही आपले शाखांचे जाले विस्तारून ग्रामीण आर्थिक विकासास हातभार लावत आहे.

**11. खुल्या बाजारातून भांडवल उभारणी :-**

व्यापारी बँकांना खुल्या बाजारातून स्वतःचे उभारणीची मिळालेली परवानगी ही बँकींग क्षेत्रातील एक महत्वपूर्ण सुधारणा मानली जाते. परिणामी सर्व राष्ट्रीयकृत बँका तसेच इतर सर्व बँकांना खुल्या बाजारातून भांडवल उभारणीचा मार्ग मोकळा झाल्यामुळे त्यांनी भांडवल उभारणीस प्रारंभ केला.

भारतात वरीलप्रमाणे अशा अनेक सुधारणा घडून आल्या आहेत. त्याचा देशाच्या आर्थिक विकासाला गती देण्यात मोलाचा वाटा राहिला आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**


1. डॉ. एस. के. ढगे : भारतीय बँकींग व्यवसाय आणि सहकार के. एस. के. पब्लिकेशन, पुणे
2. डॉ. पांडूरंग गुद्धे : बँक प्रणालीतील नवीन सुधारना दूरशिक्षण संचालनालय, स्वा.रा.ती.म.वि. नांदेड
3. प्रा.डॉ.मारोती कच्छवे : भारतीय बँक व्यवसाय, श्रध्दा पब्लिकेशन्स, सोलापूर
4. प्रा. डॉ. कचरादास पि. बैरागी व इतर : भारतीय अर्थव्यवस्था, भागीरथ प्रकाशन, पुणे.


PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani



**7. व्याज दराबाबत सुधार :-**

नरसिंहन समितीच्या शिफारशीनुसार रिझर्व्ह बँक कडून नियंत्रीत होणारी व्याजदर पद्धती बंद करावी व देशातील व्याज दराची संरचना बाजाराधिष्ठीत असावी आणि बँकांना स्वतःचे व्याजदर ठरविण्याची परवानगी देण्यात यावी असे निश्चित करण्यात आले.

**8. कर्जवसुली कायदा व कर्जवसुली न्यायाधिकरणे :-**

व्यापारी बँकांनी दिलेली कर्जे व अग्रिमे यांच्या वसुलीचा प्रश्न बँकासमोरील सर्वात महत्वाचा व बँकांना भेडसावणार आहे. त्यामुळे हा प्रश्न सोडविण्यासाठी सरकारने 1993 मध्ये वसुली कायदा समंत केला. त्यामुळे कर्ज वसुलीच्या कार्यात एक प्रकारची गती आली. तसेच 1995 मध्ये प्रमूख 8 शहरात कर्जवसुली न्यायालये स्थापन केली.

**9. बँकींग लोकपाल योजना :-**

बँकींग सेवामधील त्रुटी विरूध्द ग्राहकांच्या तक्रारीचे त्वरीत व अल्प खर्चामध्ये निवारण करण्यासाठी जून 1995 मध्ये " लोकपाल योजना' सुरत करण्यात आली. सध्या देशात असे एकून 10 लोकपाल कार्य करीत आहे.

**10. परवाना शिथिलीकरण :-**

रिझर्व्ह बँकेने नवीन व्यापारी बँका व त्यांच्या परवान त्याबाबतचे परवाना धोरण शिथील करण्यात आले आहे. परिणामी देशात खाजगी क्षेत्रात अनेक नवीन बँका स्थापना झाल्या. अनेक बँकांनी ग्रामीण आणि अर्धनागरी भागातही आपले शाखांचे जाले विस्तारून ग्रामीण आर्थिक विकासास हातभार लावत आहे.

**11. खुल्या बाजारातून भांडवल उभारणी :-**

व्यापारी बँकांना खुल्या बाजारातून स्वतःचे उभारणीची मिळालेली परवानगी ही बँकींग क्षेत्रातील एक महत्वपूर्ण सुधारणा मानली जाते. परिणामी सर्व राष्ट्रीयकृत बँका तसेच इतर सर्व बँकांना खुल्या बाजारातून भांडवल उभारणीचा मार्ग मोकळा झाल्यामुळे त्यांनी भांडवल उभारणीस प्रारंभ केला.

भारतात वरीलप्रमाणे अशा अनेक सुधारणा घडून आल्या आहेत. त्याचा देशाच्या आर्थिक विकासाला गती देण्यात मोलाचा वाटा राहिला आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**

1. डॉ. एस. के. ढगे : भारतीय बँकींग व्यवसाय आणि सहकार के. एस. के. पब्लिकेशन, पुणे
2. डॉ. पांडूरंग गुट्ठे : बँक प्रणालीतील नवीन सुधारना दूरशिक्षण संचालनालय, स्वा.रा.ती.म.वि. नांदेड
3. प्रा.डॉ.मारोती कच्छवे : भारतीय बँक व्यवसाय, श्रध्दा पब्लिकेशन्स, सोलापूर
4. प्रा. डॉ. कचरादास पि. बैरागी व इतर : भारतीय अर्थव्यवस्था, भागीरथ प्रकाशन, पुणे.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani